सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात तुरुंगातील सुरक्षा व्यवस्थेचे आधुनिकीकरण करणे या लेखाशिर्षांतर्गत प्राप्त अनुदानातुन कोल्हापुर मध्यवर्ती कारागृह तथा ठाणे मध्यवर्ती कारागृहास खरेदी करण्यात आलेल्या सी.सी.टिव्ही उपकरणांची उर्वरीत १० टक्के रक्कम अदा करण्याची प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः जेएलएम-०२१९/प्र.क्र.३६/तुरुंग-२
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०८ मार्च, २०१९.

वाचा :-

१) गृह विभाग शासन निर्णय क्रमांक : जेएलएम-०८१६/प्र.क्र.२२८/तुरुंग-२ दिनांक १४ सप्टेंबर, २०१६.
२) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांकः जेएलएम-१०१७/प्र.क्र.१३४/तुरुंग-२ दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७
३) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा. क्र. मेंटेनन्स/सुरक्ष उपकरणे/नस्ती-१०/११०१०/२०१८-१९/कक्ष-६ पुणे-१ दिनांक २२ नोव्हेंबर,२०१८ व दिनांक ०७ मार्च, २०१९ चे पत्र.

प्रस्तावना :-

सन २०१६-१७ च्या सुरक्षा व्यवस्थेच्या आधुनिकीकरणाकरीता देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार कोल्हापुर व ठाणे मध्यवर्ती कारागृह सी.सी.टिव्ही यंत्रणा उभारणीकरीता प्रती कारागृह रु.४५.०० लक्षच्या खर्चाची मान्यता संदर्भ क्र.१ नुसार देण्यात आलेली होती. प्रत्यक्ष संगणक प्रणालीवर ८० टक्के रक्कम म्हणजेच प्रती कारागृह रु ३६.०० लक्ष इतके अनुदान प्राप्त झाल्याने दि.२९/१२/२०१६ रोजीच्या राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रिये नुसार प्राप्त झालेल्या ई- निविदात कोल्हापुर व ठाणे मध्यवर्ती कारागृहाकरीता M/s Ram Sangam Infotech Pvt LTD. या संस्थेचे दर कमी असल्याने, सदर संस्थेकडुन रु.३५,९९,९६०/- (पस्तीस लक्ष नव्याण्णव हजार नऊशे साठ फक्त) इतक्या रक्कमेची सी.सी.टिव्ही यंत्रणा खरेदी करण्यात आलेली होती व ठाणे मध्यवर्ती कारागृहास M/s Comtech tetesolution Pvt LTD. या संस्थेचे दर कमी असल्याने,सदर संस्थेकडुन रु.३५,९९,९६०/-(पस्तीस लक्ष नव्याण्णव हजार नऊशे साठ फक्त) इतक्या रक्कमेची सी.सी.टिव्ही यंत्रणा खरेदी करण्यात आलेली होती.

कोल्हापुर व ठाणे मध्यवर्ती कारागृहास लावण्यात आलेल्या सी.सी.टिव्ही यंत्रणेची ई-निविदा जाहीर करतांना देण्यात आलेल्या आर.एफ.पी नुसार अदा करावयाच्या देयकाच्या रक्कमेबाबत मुद्दा क्र.४.२ बाब क्र.३ नुसार खरेदी करण्यात आलेल्या एकुण प्रकल्पाच्या किंमतीच्या ९० टक्के रक्कम ही प्रकल्पाच्या समाधानकारक तपासणी नंतर देण्यात येईल व उर्वरीत १० टक्के रक्कम पुढील ५ वर्षात २० समान हप्त्यात म्हणजेच दर ३ महिन्यानंतर अदा करण्यात येईल असे नमुद होते. त्यानुसार दि.२०.०३.२०१७ रोजी प्रकल्प पुर्ण झाल्याने, दिलेल्या खरेदी आदेशाच्या रु.३५,९९,९६०/- च्या ९० टक्के म्हणजेच रु.३२,३९,९६४/- इतकी रक्कम दि.२९.०३.२०१७ रोजी दोन्ही संस्थाना अदा केलेली असुन, उर्वरीत १० टक्के रक्कम म्हणजेच रु.३,५९,९९६/- एवढी रक्कम पुढील पाच वर्षात समान २०

हप्त्यात म्हणजेच रु १८,००० च्या १९ हप्ते व रु.१७,९९६/- चा एक हप्त्यात दोन्ही संस्थना देणे गरजेचे होते.

त्यातील सन २०१७-१८ या वित्तीय वर्षातील ४ हप्ते म्हणजेच रु ७२,०००/- ही रक्कम दोन्ही कारागृहांच्या सी.सी.टिव्ही पुरवठादार संस्थेस संदर्भाधिन क्र.२ नुसार अदा करण्यात आलेला असुन, उर्वरीत रक्कम रु २,८७,९९६/- ही रक्कम सन २०१८-१९,२०१९-२०,२०२०-२१, व २०२१-२२ या वित्तीय वर्षात रु.१८,०००/- च्या १५ व रु.१७,९९६/- चा एक अशा एकुण १६ हप्त्यात अदा करणेस मान्यता देणबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात तुरुंगातील सुरक्षा व्यवस्थेचे आधुनिकीकरण करणे या लेखाशिर्षांतर्गत प्राप्त अनुदानातुन कोल्हापुर मध्यवर्ती कारागृह तथा ठाणे मध्यवर्ती कारागृहास खरेदी करण्यात आलेल्या सी.सी.टिव्ही उपकरणाच्या खरेदीच्या उर्वरीत १० टक्के हप्त्याची रु.२,८७,९९६/- ही रक्कम रुपये १८,०००/- चे १५ व रु.१७,९९६/- च्या १ हप्त्यात सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या कालावधी दरम्यान अदा करण्यास संदर्भ क्र.३ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास या शासन निर्णयान्वये शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२ दिनांक १७ एप्रिल, २०१५ भाग पहिला, उप विभाग २ मधील अ.क्र ४ नियम ७ च्या मधील अटीस अधीन राहून प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

३. यावरील होणारा खर्च मागणी क्र. मागणी क्र बी-५, मुख्य लेखाशिर्ष २०५६ तुरुंग (००)(१०१) तुरूंग (००)(१८) तुरूंगातील सुरक्षा व्यवस्थेचे आधुनिकीकरण करणे (२०५६ ०२२२) (योजनांतर्गत योजना), ५२ यंत्रसामुग्री व साधन सामुग्री या लेखा शीर्षाखाली दर्शविण्यात येऊन त्या त्या वित्तीय वर्षामध्ये उपलब्ध होणाऱ्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१२१५२८४५५०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Narayan Shrikrishna Karad

Digitally signed by Narayan Shrikrishna Karad
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9a5ba422569807a70f83ba75f7e5057f99ed671bf7ac8f8fb14e28b9d6f90514, cn=Narayan Shrikrishna Karad
Date: 2019.03.12 15:31:02 +05'30'

(ना.श्री. कराड)
उप सचिव, गृह विभाग

प्रत,

१) पोलीस महासंचालक, कारागृह, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) विशेष पोलीस महानिरीक्षक, कारागृह (मुख्यालय) , महाराष्ट्र राज्य, पुणे.

४) विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई.
५) कारागृह उपमहानिरीक्षक, (पश्चिम विभाग),पुणे
६) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य १ मुंबई,
७) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य १ मुंबई,
८) जिल्हा कोषागार अधिकारी, (कोल्हापूर/ठाणे)
९) क.अ. (बीयुडी-१) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई -३२,
१०) निवड नस्ती (तुरुंग-२).

****